भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६७९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०९/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक २५+२६/०९/२०१७ चे २०१७ चे रात्र. दरम्यान यातील फिर्यादी सुरेष भालु कुंभरे आपली सीडी डिलक्स हिरो होंडा मोटार सायकल क्रमांक एमएच ३१ बीएल ९८९५ किंमती २५,०००/–रु. ची घराचे समोरील अंगणात ठेवुन दुर्गादेवीचे कार्यक्रम पाहण्यास गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी याचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दांत शिवीगाळ करुन डोक्यावर काठीने मारुन जखमी केले. . :–**

दिनांक २९/०९/२०१७ चे ०९.४५ वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीस 'माझे घरा समोर शेळया का बांधल्या' असे म्हणुन भांडण करुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन फिर्यादीचे डोक्यावर काठीने मारुन जखमी केल्याने फिर्यादी मधुकर काशीराम जांगळे वय ४५ वर्ष, रा. देव्हाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २९४,३२४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सरोदे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**३) अज्ञात वाहनाच्या धडकेत एक जखमी . :–**

दिनांक २८/०९/२०१७ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अनिकेत मिलींद कानेकर वय २३ वर्ष, रा. एमबी पटेल कॉलेज पंचशील वार्ड साकोली याचा भाऊ अनुराग मिलींद कानेकर वय २५ वर्ष, रा. साकोली हा आपले पॅशन मोटार सायकल क्र. एमएच –३६/ जे –७७५३ ने लाखनी कडुन साकोली कडे परत येत असताना यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला धडक मारुन अनुराग यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**४) चारचाकी वाहनाच्या धडकेत एसटीचे नुकसान झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/०९/२०१७ चे १०.२५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी निलकंठ शांताराम सार्वे वय ३२ वर्ष, रा. विनोबा नगर तुमसर आपले ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन एसटी बस क्र. एमएच ०७ सी ७३४६ ही फेल असल्याने रोडचे डावे बाजुने ऊभी असता तिला धडक मारुन अपघात करुन स्वत:चे वाहनाचे व एसटी बसचे किरकोळ नुकसान केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कुंभलवार पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

**५) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे चालवुन सुरक्षा कटरे तोडुन शासनाचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०९/२०१७ चे २२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन रा. म.क. ३५५ वरील सुरक्षा कटरे तोडुन व ट्रक नाल्यात पडुन शासनाचे अंदाजे १,००,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी पांडुरंग नत्थुजी माथुरकर वय ५७ वर्ष, रा. गुजराथी कॉलोनी भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. तिवाडे पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

६) घरातुन सोन्याची काळी पोथ, मनी, व नगदी पैश्याची चोरी. :—

दिनांक २९/०९/२०१७ चे ०८.०० ते १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. धनवंता कुंडलींग चिचखेडे वय ६५ वर्ष, रा. बेरोडी यांचे खुल्या घराचे खोलीमध्ये खाटेवर बिस्तराचे खाली ठेवलेली सोन्याची काळी पोथ ज्यात २ मोठे मनी व १५० बारीक मनी वजन अंदाजे १६ ग्रॅम, स्वोटर मधील नगदी ९१०/—रु. असा एकुण २८,११०/—रु. चा माल संशयीत आरोपी व त्याचे सोबत बालक यांनी चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

७) जळुन औषधोपचारा दरम्यान मुलीचा मृत्यु :—

दिनांक १९/०९/२०१७ चे ०७.३० वाजता दरम्यान यातील मृतक कु. कोमल भागवत नागपुरे वय १६ वर्ष, रा. खमारी ही सकाळी घरी चुल पेटवित असता काळयांवर मातीचा तेल टाकुण काळया पेटविण्यास गेली असता अचानक भडका होवुन तिचे समोरी भागाला आग लागल्याने व समोराचा भाग जळाल्याने तिला औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक २९/०९/२०१७ चे १२.४५ वाजता दरम्यान मरण पावल्याने डॉ. डोकरीमारे सामान्य रुग्णालय भंडारा यांचे पो. शि: आगासे ब. न. १०९० पो. स्टे भंडारा यांच हस्ते मेमो प्राप्त झाल्याने व मृतकचे फिर्यादी भाऊ क्रिष्णा भागवत नागपुरे वय १९ वर्ष, रा. खमारी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

८) गळफास लावुन इसमाचा मृत्यु. :—

दिनांक २९/०९/२०१७ चे ०९.०० ते ११.३० वाजता पुर्वी यातील मृतक फत्तु सोना सोनवाने वय ५० वर्ष, रा. मुरमाडी हा सकाळी ०९.०० वाजता दरम्यान स्वतःचे शेतावर जावुन तळयाचे पाळीवरील चिंचेच्या झाडाला नॉयलॉन दोरीने गळफास लावुन मृत अवस्थेत गावकऱ्यांना दिसुन आल्याने फिर्यादी सदाराम सुपत गजबे वय ६५ वर्ष, रा. मुरमाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुरमाडी पो.स्टे दिघोरी हे करीत आहेत.

९) अवैध दारू /जुगार अडयावर धाडी . :—

दिनांक २९/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. मोहाडी, तुमसर, लाखणी, पालांदुर लाखांदुर, मोहाडी व वरठी येथे अवैध दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण १३ गुन्हे दाखल करून ८१ लिटर हा.भ. दारू+ १२० किलो सडवा मोहा+ साहित्य किंमती १६,६००/—रु, व ३६८ लिटर ६४० मिली लिटर विदेशी+देशी दारू+१ स्कार्पीओ गाडी+ १ मोटार सायकल किंमती ७,०७,२८० /—रु. तसेच जुगारातुन किमती ५७,६३७/रु असा एकुण किंमती ७,८१,५१७/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २९/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०४ केसेस करण्यात आले आहे.

30.9

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता